कृषि विद्यापीठांतर्गत शेतीची कामे करणा-या शेत मजुरांना व कृषि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालय/संस्थातील शेत मजुरांना किमान वेतन कायद्याअंतर्गत लागु केलेला सुधारीत विशेष भत्ता लागु करणेबाबत.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**वाचा :-**
१. उद्योग उर्जा कामगार विभाग अधिसुचना क्र.एमडब्ल्युए-२०१४/२४६/सीआर-५६/एलएबी-७, दि. ०८/०८/१४.
२. शासन पत्र क्र.पंदेवि-१३१६/प्र.क्र.५६/६-अे, दिनांक १०/०८/२०१६.
३. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीएमसी/विशेष भत्ता/२०२३/२२१६, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२३.
४. कामगार उपआयुक्त (ग्रा.वि.) यांनी दिनांक ०६/०८/२०२४ च्या पत्रान्वे जाहिर केलेल्या विशेष भत्त्याबाबत.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाने संदर्भ ०१ नुसार महाराष्ट्र राज्यातील शेत मजुरांच्या किमान वेतन दरात वाढ झाल्याबाबतचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेली अधिसुचना आवश्यक कार्यवाहीसाठी विद्यापीठास प्राप्त झाल्यामुळे कृषि विद्यापीठातील सर्व कृषि महाविद्यालये, प्रक्षेत्रे, योजना, कृषि तंत्र विद्यालय इत्यादी ठिकाणी कार्यरत असणा-या रोजंदार मजुर/तांत्रिक रोजंदार मजुरांना दैनिक दर दिनांक ०८ ऑगष्ट, २०१४ पासुन लागु करण्यात आले आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. ०४ वर नमुद परिपत्रकानुसार कामगार उपआयुक्त (ग्रा.वि.) यांनी दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४ रोजी किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत अनुसूचित उद्योगातील **'शेतकी कामधंदा'** या शिर्षाअंतर्गत काम कारणा-या कामगारांना विशेष भत्त्याबाबतचे दर दिनांक ०१/०७/२०२४ ते ३१/१२/२०२४ या कालावधीकरीता जाहिर करण्यात आले आहेत.

## आदेश

**जा.क्रमांक बीएमसी/विशेष भत्ता/२०२४,/1853** **दिनांक :- २२ सप्टेंबर, २०२४.**

असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त नमुद परिपत्रकातील अनुज्ञेय असलेले विशेष भत्त्याचे सुधारीत दर पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक ०१ जुलै, २०२४ पासुन विद्यापीठातील रोजंदार मजुर/तांत्रिक रोजंदार मजुरांना खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे लागु करण्यात यावे व त्यानुसार थकबाकी अदा करण्यात यावी.

**तक्ता**

| अनुसूचित उद्योगाचे नांव | प्रचलित विशेष भत्त्याचे दर | सुधारीत विशेष भत्त्याचे दर | कालावधी |
|---|---|---|---|
| संस्थात्मक शेती 'शेतकी कामधंदा' | ३७०८/-प्रति महिना | ४००२/- प्रति महिना | ०१/०७/२०२४ ते ३१/१२/२०२४ |

उपरोक्त निर्दीष्ट केलेला सुधारीत विशेष भत्ता प्रतिमहिना रोजंदारीचे प्रती दिवसाप्रमाणे हजर दिवसाचे देयक अदा करावे, तसेच रोजंदार कामगारांना देय असलेले मजुरीचे व विश्७ेष भत्त्याचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल, त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या व विशेष भत्त्याच्या दरांना २६ ने भागुन प्रती दिवसाची मजुरी अदा करावी, तथापी विशेष भत्त्याकरीता प्रतीमाह ठरविलेल्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिका-यांची राहील. याकरीता होणारा खर्च आस्थापनेवरील संबंधित कार्यालयाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मंजुर केलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा.

उपरोक्त आदेश विद्यापीठ वित्त प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

मा. कुलगूरू यांच्या मंजुरी व आदेशाने

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलिपी :- **प्रभारी अधिकारी**
**कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष,**
**डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला**

उपकुलसचिव (आस्थापना),
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला